
## हत्तीचा दुष्टान्त

### स्वाध्याय

अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.



उत्तर: १. भिंतीसारखा २. खांबासारखा
३. मुसळासारखा ४. सुपासारखा
५. खराट्यासारखा ६. कोथळ्यासारखा

**क्र.२. आकृतिबंध पूर्ण करा.**

| दृष्टान्त | | संदेश |
|---|---|---|
| हत्ती | → | १ |
| २ | → | एकेक शक्ती |

उत्तर: १. परमेश्वर २. एकेक अवयव

**क्र.३. ओघतक्ता पूर्ण करा.**

गावात हत्ती आला
↓
१
↓
एकमेकांशी संवाद साधू लागले
↓
२
↓
डोळस माणसाने त्यांचे गैरसमज दूर केले

**उत्तर:** १. जात्यंध हत्ती पाहायला गेले.

२. एकमेकांशी वाद घालू लागले.

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| १. | **गावातील हत्ती पाहायला गेलेले लोक असे होते** → | |
| २. | **जात्यंधांनी यास हत्ती मानले** → | |

**उत्तर:** १. जात्यंध (जन्मत:च आंधळे)

२. हत्तीच्या अवयवास

**कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. जो जें होऔनि असे ______

अ. तो तेंचि पाहे। ब. तो तेंचि बोले।

क. तो तेंचि जाणे। ड. तो तेंचि न बोले।

२. ऐसा अवएवी युक्त ______

अ. तो जात्यंध।। ब. तो परमेश्वरू।।

क. तो हस्ति।। ड. तो शक्ति।।

**उत्तर:** १. जो जें होऔनि असे **तो तेंचि बोले।**

२. ऐसा अवएवी युक्त **तो हस्ति।।**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. जात्यंध वाघ पाहायला गेले.

२. जात्यंध लोकांना हत्ती वेगवेगळा भासला.

३. जो तो आपल्या अनुभवानुसार विचार करतच नाही.

४. अनंत शक्ती परमेश्वरही प्रत्येकाला त्याच्या अनुभवानुसार वेगवेगळा भासतो.

**उत्तर:** १. असत्य २. सत्य
३. असत्य ४. सत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

'हत्ती' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** गावात कोणता प्राणी आला?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. दिलेल्या शब्दांना प्रमाण भाषेतील शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. हस्ती : | | २. परि : | |
| ३. पावो : | | ४. पूंस : | |
| ५. उरोधीति : | | ६. कानु : | |

**उत्तर:** १. हत्ती २. पण
३. पाय ४. शेपटी
५. बोलतात ६. कान

**कृ.२. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

१. जन्मापासून अंध असलेला :

२. दृष्टी असलेला :

३. उखळामध्ये धान्य कांडण्याचे लाकडी साधन :

उत्तर: १. जात्यंध २. डोळस

३. मुसळ


**कृ.३. खालील शब्दांना उताऱ्यातील पर्यायी शब्द शोधा.**

१. हत्ती, गज, मातंग :

२. पुंज, शेपूट, पुष्टी :


उत्तर: १. हस्ति २. पूंस

**कृ.४. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**




उत्तर: विषय, विष, व्यवस्था, व्यय, वय

**कृ.५. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.**




उत्तर: सकाळ

**कृ.६. पुढील अपूर्ण वाक्य विविध प्रकारे योग्य शब्दयोजनेने पूर्ण करा.**

सकाळी गावात मदारी माकड घेऊन आला, ________.

**उत्तर:** १. सकाळी गावात मदारी माकड घेऊन आला, **तेव्हा माकडाला पाहण्यासाठी मुलांनी एकच घोळका केला.**

२. सकाळी गावात मदारी माकड घेऊन आला, **तेव्हा गावकऱ्यांना त्याचं फारसं कौतुक वाटलं नाही; पण मी शहरातला असल्याने मला फार अप्रूप वाटलं.**

**क. माझा अभ्यास - व्याकरण**

**कृ.१. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | ईश्वराची | | |
| २. | गांवा | | |

**उत्तर:**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | ईश्वराची | ची | षष्ठी |
| २. | गांवा | आ | सप्तमी |

**कृ.२. वाक्यातील अधोरेखित अव्ययाचा प्रकार लिहा.**

१. तेथ जात्यंध हस्ती पाहों गेले।

अ. शब्दयोगी अव्यय

ब. क्रियाविशेषण अव्यय

क. केवलप्रयोगी अव्यय

**उत्तर:** क्रियाविशेषण अव्यय

२. 'कानु देखीला तो म्हणे हस्ती सुपासारीखा'

अ. उभयान्वयी अव्यय

ब. क्रियाविशेषण अव्यय

क. शब्दयोगी अव्यय

**उत्तर**: शब्दयोगी अव्यय

**कृ.३. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. अनंतशक्ती २. परमेश्वर

**उत्तर**:

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १. | अनंतशक्ती | अनंत अशी शक्ती | कर्मधारय समास |
| २. | परमेश्वर | परम् असा ईश्वर | कर्मधारय समास |

**कृ.४. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

तेथ जात्यंध हस्ती पाहों गेले।

**उत्तर**: तेथ **जात्यंध** हस्ती पाहों **गेला**।

**कृ.५. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. दृश्टान्त | दुष्टान्त | दृष्टान्त | दृस्टान्त

२. शक्ति | शक्ती | शकती | श्कती

३. व्यवस्था | वव्यस्था | व्यवस्ता | व्यवस्था

**उत्तर**: १. दृष्टान्त २. शक्ती

३. व्यवस्था

**ड. माझे मत**

**कृ.१. 'जो तो आपापल्या अनुभवानुसार विचार करतो' याबाबत तुमचे मत स्पष्ट करा.**

**उत्तर:** 'जो तो आपापल्या अनुभवानुसार विचार करतो' हे खरेच आहे. अनेकदा आपण आपल्याला आलेल्या अनुभवांच्या आधारे ठरावीक गोष्टींबद्दल, परिस्थितींबद्दल, व्यक्तींबद्दल निष्कर्ष काढून मोकळे होतो. कारण आपण केवळ व्यक्तिसापेक्ष दृष्टीने त्याकडे पाहत असतो. त्याच गोष्टीचा, परिस्थितीचा किंवा व्यक्तीचा इतरांना आणखी वेगळा अनुभव येत असतो, त्यामुळे स्वत:च्या अनुभवावर आधारित आपले विचार, निष्कर्ष अचूक ठरत नाहीत. एखाद्या गोष्टीचे पूर्ण स्वरूप समजून घेण्यासाठी त्याच्या सर्व बाजू पाहाव्यात, सर्व दृष्टिकोनांतून विचार करावा. आपल्याला आलेला अनुभव हा केवळ एकच पैलू असू शकतो, ही शक्यता ध्यानात घ्यावी. तरच आपले विचार केवळ स्वानुभवावर आधारित न राहता सर्वसमावेशक होतील.

## सारांश लेखन

**'हत्तीचा दृष्टान्त' हा पाठ लक्षपूर्वक वाचून पाठाच्या आशयाचा सारांश लिहा.**

ही एक दृष्टान्तकथा असून याद्वारे केसोबासांनी महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांसाठी सोपे करून सांगितले आहे. एका गावात एक हत्ती येतो. हत्ती पाहण्यासाठी काही जन्मांधळे जातात. प्रत्येकजण हत्तीच्या एकेका अवयवाला स्पर्श करून तो अवयव म्हणजेच पूर्ण हत्ती असा समज करून घेतो. तेव्हा डोळस मनुष्य त्यांना सांगतो, की या सर्व अवयवांचा मिळून हत्ती बनला आहे. परमेश्वराचेही असेच आहे. मर्यादित बुद्धीच्या माणसाला ईश्वराची जी प्रचीती येते, तिलाच तो परमेश्वर मानतो; पण खरा ज्ञानी जाणतो, की ही केवळ परमेश्वराची काही शक्तिरूपे आहेत, या सर्व शक्तींनी मिळून परमेश्वर बनला आहे.